| CNR No.MHPU13-002785-2021 | **नियमीत दिवाणी दावा क्र.३११/२०२१**<br>**सुनिल पन्नालाल लुणावत वगैरे,**<br>**वि.**<br>**भालचंद्र श्रीपती बाबर** |
| --- | --- |

**निशाणी क्र. ७९ वरील आदेश**

(दि. ०५.०२.२०२६ रोजी पारित )

१. प्रस्तुतचा अर्ज वादी तर्फे कागदयादीसोबत पेनड्राईव्ह, प्रमाणपत्र व अन्य कागदपत्र दाखल करणेसाठी परवानगी मिळणेबाबत दाखल केला आहे.

२. वादी यांचे असे कथन आहे की, वादी याने दाव्याचे कामी यापुर्वी काही महत्वाचे कागदपत्र दाखल केलेले नाहीत. संबंधीत कागदपत्र दाव्याचा अंतिम न्यायनिर्णय गुणदोषावर करणेचे दृष्टीने अत्यंत महत्वाचे असे कागदपत्र आहेत. प्रतिवादी यांनी दावा मिळकतीमध्ये येवुन गैरकायदा हरकत वादी यांना केली त्या प्रसंगाचे व्हीडीओ चित्रण वादीने स्वतः व त्यांचे सहकारी यांचे मदतीने स्वतः चे मोबाईलवर काढलेले होते. वादी यांचे मोबाईलमध्ये असलेले सदरचे चल–चित्रण, वादीने स्वतःचे मोबाईवरुन अलिकडेच पेन ड्राईव्ह मध्ये घेतलेले आहे. सदरचा पेन ड्राईव्ह व इतर कागदपत्रे पुरावा म्हणून सदरकामी दाखल करुन घेणेबाबत आवश्यक आहे. असे कथन करुन अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

३. प्रतिवादी यांनी निशाणी क्र. ८० येथे त्यांचे म्हणणे देवून असे कथन केले आहे की, यादीतील अनु.क्र १ ते ५ ही कागदपत्रे मुळ, प्रमाणित प्रती व माहितीचा अधिकार कायद्याखाली मागवलेली आहेत. तथापि, यादीसोबत अनु क्र. ६ ते ८ येथे असलेली कागदपत्रे या झेरॉक्स प्रती आहेत. ती प्राथमिक अथवा दुय्यम पुरावा म्हणून वाचली जावू शकत नाहीत. असे कथन करुन अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

४. वादी व प्रतिवादी तर्फे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. वादी दाखल करु इच्छीत असलेले कागदपत्रे अभिलेखावर घेवून त्यास त्याची बाजू मांडण्याची संधी देणे आवश्यक आहे. प्रतिवादीतर्फे विधिज्ञांचे असणारे आक्षेप घेण्याची संधी त्यांना पुरावाच्या वेळी असणार आहे. अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. सबब, वरील विवेचनाचा विचार करुन खालील आदेश पारीत करत आहेः–

नि.दि.दा.क्र. ३११/२०२१

## <u>आदेश</u>

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. कागदपत्रे अभिलेखावर दाखल करुन घेण्यात येतात.

RAVINDRA ANANDRAO SAWANT Digitally signed by RAVINDRA ANANDRAO SAWANT Date: 2026.02.05 13:04:43 +0530

( रविंद्र आ. सावंत )

दिनांकः ०५.०२.२०२६ २ रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,

सासवड. सासवड.

# CERTIFICATE

"I affirm that the contents of this P.D.F. file orders are same word for word as per original Judgment/order."

| | | |
|---|---|---|
| Name of Steno | : | P. R. Shirke (Stenographer Grade III) |
| Court Name | : | Shri. R. A. Sawant<br>C.J.J.D.& J.M.F.C.,Saswad. |
| Date | : | 05/02/2026 |
| Order signed by presiding officer on | : | 05/02/2026 |
| Order Uploaded on | : | 05/02/2026 |